## महत्त्वाचे

### दुर्गादेवी मोहोड यांना पीएच. डी. प्रदान



औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पाली अँड बुद्धिझम विषयामध्ये दुर्गादेवी प्रभाकर मोहोड यांना पीएच. डी. प्रदान केली आहे. डॉ. मनीष आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली 'महापंडित राहुल सांकृत्यायन यांचे सामाजिक, धार्मिक, साहित्यिक व राजकीय कार्य : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर केला.

### शहिदांना अभिवादन

औरंगाबाद : विद्यापीठ नामांतर लढ्यातील शहीद गौतम वाघमारे यांना भारतीय दलित पँथरच्या वतीने अभिवादन करण्यात आले. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पँथरचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण भुतकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अमोल भुतकर, प्रकाश पवार, अनिल घुसळे, दशरथ कांबळे, गोरख गायकवाड, कांताबाई घुसळे, गीताबाई म्हस्के, पार्वताबाई घोरपडे, रामदास पगडे, सर्जेराव लोखंडे, सचिन जाधव आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साठे साहित्य संमेलन

औरंगाबाद : अण्णाभाऊ साठे साहित्य व कला अकादमीच्या वतीने नागपूर येथे ११ व १२ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र, समीक्षा, लेखसंग्रह याशिवाय त्यांच्या साहित्यावरील पुस्तकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासाठी लेखकांनी दोन प्रतीमध्ये ३१ डिसेंबरपर्यंत पुस्तके पाठवावीत. पुरस्काराचे स्वरुप रोख एक हजार रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे राहील. डॉ. सुरेश चौथाईवाले (औरंगाबाद), चंद्रकांत वानखेडे (नागपूर), डॉ. विठ्ठल भंडार (नांदेड), संजीव भागवत (मुंबई) यांच्याकडे पुस्तके पाठविण्याचे आवाहन प्रकाश डोंगरे यांनी केले आहे.

### संशयित पकडला

औरंगाबाद : रेल्वेस्टेशन परिसरातील एका हॉटेलशेजारी अंधारात लपून बसलेल्या शिवा विश्वनाथ भोसले (३४, रा. मालगाव, ता. वैजापूर) या तरुणाला वेदांतनगर पोलिसांनी अटक केली.

---

**आधीच्या घोषणेचा विसर : मराठवाड्यातील २१ हजार किमी रस्ते अजूनही खड्ड्यातच**

# खड्डेमुक्तीची आणखी एक घोषणा ठरणार



**औरंगाबाद :** आधी दोन वेळा खड्डेमुक्तीची घोषणा होऊनही मराठवाड्यात सुमारे २१ हजार किमी रस्ते खड्डेमुक्त होऊ शकले नाहीत. आता पुन्हा नव्याने पुन्हा डांबर- माती टाकण्याची झालेली घोषणादेखील कागदावरच राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्यात युती सरकारच्या वर्षपूर्तीला आणि त्यानंतर द्विवर्षपूर्तीनिमित्त राज्यातील खड्डे बुजविण्याची घोषणा करण्यात आली होती. प्रत्यक्षात ते काम झालेच नाही. आता पुन्हा १५ डिसेंबरपर्यंत खड्डे बुजविण्याची 'डेडलाईन' जाहीर केली आहे. मराठवाड्यातील रस्त्यांच्या कामाकडे राज्य सरकारचे आधीच दुर्लक्ष झाले आहे. खड्डेमुक्तीच्या याआधीच्या दोन वेळा झालेल्या घोषणांप्रमाणे कामेही झाली नाहीत. २०१५ मध्ये पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे रस्ते फारसे खराब झाले नाहीत. २०१६ मध्ये पावसाने मराठवाड्यातील प्रमुख शहरांसह अनेक रस्ते खराब केले. विभागातील सुमारे २१ हजार कि. मी. पर्यंतचे रस्ते खड्ड्यात असून, २ कोटी नागरिकांचे हाल रस्त्यांमुळे होत आहेत.

बांधकाममंत्री चंद्रकांत पाटील यांना आजवर जेव्हा जेव्हा मराठवाड्याच्या रस्त्यांबाबत विचारणा केली, तेव्हा त्यांनी प्रत्येक वेळी नवीन डेडलाईन जाहीर केली. परंतु त्या डेडलाईननुसार मराठवाडा खड्डेमुक्त झालाच नाही. परिणामी मराठवाड्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणारे रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी करण्यात आलेल्या घोषणा कागदावरच राहिल्या आहेत.

मे २०१५ मध्ये अभियंता संवाद कार्यक्रमात बांधकाममंत्री पाटील यांच्या उपस्थितीत खड्डे कशा पद्धतीने भरायचे, याबाबतचे प्रशिक्षणही देण्यात आले. नियोजनबद्ध आणि तांत्रिकदृष्ट्या खड्डे कसे भरायचे, याच्या स्पष्ट सूचना देऊनही स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी खड्डेमुक्त अभियानाचा बोजवारा उडविला. काही ठिकाणी खड्डे भरण्याचे थातुरमातुर काम झाले. तर काही ठिकाणी निधी नाही म्हणून कामच झाले नाही. मराठवाडा सद्य:स्थितीत खड्ड्यांतून मार्ग काढत असल्याची स्थिती आहे. ऑक्टोबर महिन्यातील पावसाने मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड जिल्ह्यांतील बहुतांश रस्त्यांचे नुकसान झाले आहे. विभागात केंद्र शासन, राज्य शासनाचे मिळून ६५ हजार ४९७ किलोमीटर रस्ते आहेत. १२ हजार २५२ किलोमीटर जिल्हा रस्ते आणि ३१ हजार ३६८ किलोमीटर ग्रामीण रस्ते जिल्हा परिषदेकडे आहेत. २१ हजार किलोमीटर रस्ते बांधकाम तर ८१६ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाची देखभाल केंद्र शासन करते.

**१५ मिनिटांत खड्डा भरतो**

'जेट पॅचर' ही मशीन ट्रकवर असते. जेट प्रेशरने खड्डा स्वच्छ होतो. पाईपमधून खड्ड्यावर इमल्शन डांबराचा जेट स्प्रे करून टॅक कोट मारल्यानंतर पाईपमधून डांबरमिश्रित खडीने खड्डा भरतो. जेट पॅचरमुळे पैसा, वेळ, सामुग्री, मनुष्यबळ व भांडवली खर्चात बचत होते. ही मशीन कोल्ड इमल्शन टेक्नॉलॉजी व धुतलेल्या सामुग्रीचा (खडी, रेती) वापर करते. खड्डा भरल्यानंतर तासाभरात रस्ता वाहतुकीसाठी खुला होतो. या यंत्राने ५० मि. मी. खोल आणि ३ चौ. मी. क्षेत्रफळाचा खड्डा भरण्यासाठी १५ मिनिटे लागतात.

रस्त्याचा पाया चांगल्या प्रतीचा असल्यास या जेट पॅचरद्वारे बुजविलेले खड्डे दोन वर्षांहून अधिक काळ टिकतील, असा दावा करण्यात येत आहे. या यंत्राद्वारे सर्व प्रकारचे थर देण्यात येत असल्यामुळे खड्डे भरण्याची प्रक्रिया जलद होते. प्रदूषण होत नाही, भेसळ होत नाही. उत्पादकताही उच्च दर्जाची असते. ५ जेट पॅचर राज्यात प्रायोगिक तत्त्वावर वापरण्यात येत असून, मराठवाड्यात त्याचा प्रयोग येत्या काही दिवसांत होणे शक्य असल्याचे बांधकाम विभागाकडून समजले.

**आता 'जेट पॅचर' वापरणार**

- खड्डेमुक्त मराठवाडा ही संकल्पना राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आधुनिक विचार सुरु केला आहे. राज्यातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी 'जेट पॅचर' या अत्याधुनिक यंत्राच्या वापरास सुरुवात केली आहे. यापूर्वी पारंपरिक पद्धतीने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात येत होते. त्यामुळे रस्त्यांचा दर्जा राखला जात नव्हता, तसेच दुरुस्तीसाठी वेळ लागत होता.
- यावर कायमस्वरुपी पर्याय काढण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. यापुढे प्रमुख मार्गांवरील खड्डे बुजविण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर 'जेट पॅचर' या अत्याधुनिक यंत्राचा वापर करण्याचे ठरले आहे. मुख्य अभियंता एम. एम. सुरकुटवार म्हणाले, या पद्धतीने खड्डे बुजविण्यासाठी लवकरच तयारी केली जाण्याची शक्यता आहे.

---

# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS

Aurangabad Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
11 Dec 2016

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME



**मी धावणार माझ्यासाठी**

औरंगाबाद हाफ मॅरेथॉन हा लोकमतने आयोजित केलेला अतिशय चांगला उपक्रम असून, या स्पर्धेत मी सहभागी होणार आहे. व औरंगाबादच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त लोकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे.

**-सतीश गोरे,** (सीमएमडी), इरा किडस् स्कूल

'लोकमत'तर्फे आयोजित औरंगाबाद हाफ मॅरेथॉन हा एक उत्कृष्ट उपक्रम शहरात राबविण्यात येत असून आम्ही सर्व जण यामध्ये सहभागी होत आहोत. या मॅरेथॉनमध्ये सर्व रनर्स ग्रुप, खेळाडू, कॉलेज तरुण, तरुणी, महिला, पुरुषांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन एकतेचे दर्शन घडवावे.



**-मिलिंद पाटील,**
कार्यकारी संचालक, सान्या मोटर्स आणि सारा मोटर्स.

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२




**इरा किड्स स्कूल...** (डावीकडून) शुभांगी सुरडकर, अमृता शेटे, शीतल पाटील, संध्या तेली, क्रांती शहाणे, शर्मिष्ठा दत्ता, स्मिता शिंदे, रोहिणी देशपांडे, अस्मिता गुप्ता, स्वाती सुरडकर, संगीता कुरकुरे, सुषमा सुरडकर. (मध्यभागी) सतीश गोरे (सीएमडी), रेखा गोरे (डायरेक्टर, इरा इंटरनॅशनल स्कूल).




**लायन्स क्लासिक ग्रुप...** (डावीकडून) राम उपाध्याय, पंकज पांडे, राहुल अग्रवाल, भाऊसाहेब गवळी, गिरीश पोडे, किरण पहाडे, मिलिंद दामोदरे, दीपक पुराणिक, संदीप दोडल, डॉ. ओमप्रकाश पाटसकर, सुनील ठोळे, अनंद रुणवाल, दिपक मुंदडा (अध्यक्ष) राजेंद्र जेलमी, सचिन बडजात्या , पंकज पांडे, शशिकांत जालान (सचिव), नीलेश गंगवाल, राजेश राऊत, शेखर तोरणेकर, गिरीश कंदी.




**एस.पी. ग्रुप ...** (डावीकडून) अर्जुन देठे, बलभीम गायकवाड, सुभाष पुजारी, ॲड. अंबादास कवरे, चंद्रशेखर कुलथे, कृष्णा ठोंबरे, सखाराम कुडके, विजय पाटणेकर.




**इनर व्हिल क्लब ऑफ औरंगाबाद लोटस...**
(डावीकडून) निकिता अग्रवाल, स्वाती कासलीवाल, लता केला, परवीन सिंग, गुरुलिन कोहली, साक्षी छलानी, प्रियंका अग्रवाल, वैशाली सदगुले.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL
Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: रति मसाले | blueumbrella

---

# भावनांचा अतिरेक करणे टाळा

**मयूर चंदणे यांचे प्रतिपादन : सखी मंचतर्फे कार्यशाळेचे आयोजन**

लोकमत सखी मंच

**औरंगाबाद :** ताणनिर्मितीचे मूळ कारण हे आपण स्वत: आहोत. आपले मन, आंतरिक व्यक्तिमत्त्व म्हणजेच आपला स्वभाव, बाह्य परिस्थिती ही ताण निर्माण होण्याची मुख्य कारणे आहेत, असे प्रतिपादन मयूर चंदणे यांनी केले. सखी मंच आयोजित मनशक्ती केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या 'ताण व्यवस्थापन आणि कार्यक्षमता वृद्धी' या कार्यशाळेत त्यांनी उपस्थित सखींना मार्गदर्शन केले. शुक्रवारी लोकमत भवन येथे हा कार्यक्रम पार पडला.

मन हे शक्तीरूप आहे. त्यामुळे ते कधीच दिसत नाही. आपल्याला फक्त त्याचा अनुभव घेता येतो. शरीर हे मनाच्या इच्छा पूर्ण करण्याचे केवळ एक माध्यम असते, त्यामुळे खऱ्या सुखासाठी मनावर इलाज करणे महत्त्वाचे आहे, असे चंदणे यांनी सांगितले. आपण सगळेच सुखासाठी धडपड करीत असतो; परंतु सुखामागे धावताना दु:ख पाठीमागे येते.

एकच गोष्ट काही जणांसाठी सुख तर काही जणांसाठी दु:ख असते. त्यामुळे सुखाची व्याख्या प्रत्येकासाठी वेगवेगळी असते, असे त्यांनी सांगितले. दैनंदिन आयुष्यात येणारे ताणतणाव कशा प्रकारे कमी करावेत आणि आपली कार्यक्षमता कशी वाढवावी, याविषयी चंदणे यांनी सखींना मार्गदर्शन केले.

आपल्याच स्वभावातील गुण-दोष हे ताणनिर्मिती करीत असतात. अतिराग, भित्रेपणा, अहंकार यासारख्या गोष्टींवर आपण विनाकारण आपली ऊर्जा खर्च करतो. अहंकाराचा फुगा ज्ञानाची टाचणी टोचताच फुटून जातो. त्यामुळे भावनांचा अतिरेक टाळा, असा मोलाचा कानमंत्र चंदणे यांनी सखींना दिला. एका मिनिटासाठी आलेला राग दोन वॅटचा बल्ब आठ मिनिटांसाठी जळू शके ल, एवढी आपली ताकद खर्च करतो, हे उदाहरण देऊन त्यांनी भावनांवर नियंत्रण ठेवणे किती आवश्यक आहे, ते पटवून दिले.



सखी मंचच्या वतीने घेण्यात आलेल्या 'ताण व्यवस्थापन आणि कार्यक्षमता वृद्धी' या कार्यशाळेस सखींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना मयूर चंदणे.

**अतिरेक टाळा**

- सुरळीत यश, मान-सन्मान, संपत्ती, सत्ता, कौटुंबिक सुख, आरोग्य, शांत मरण, स्वर्गसुख या आठ प्रकारच्या सुखांसाठी माणूस आयुष्यभर झगडत असतो. ही आठ सुखे मिळविण्यासाठी मात्र आपण लोभ, काम, क्रोध, मद, मत्सर, माया या सहा विकारांची मदत घेतो. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादिनंतर सुखाचा अतिरेक टाळा, असा सल्ला चंदणे यांनी दिला.

---

# जि.प.ने व्याजासह निधी परत द्यावा

**चौकशी करावी : कर्मचारी कल्याण निधीचा हिशेबच नाही**



**औरंगाबाद : कर्मचारी** कल्याण निधीमध्ये जमा रक्कम व्याजासह परत द्यावी, अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर अर्दड यांच्याकडे केली.

दोन दिवसांपूर्वी प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष दिलीप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी अर्दड यांची भेट घेऊन शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली व निवेदनही सादर केले. यावेळी काही प्रमुख मागण्यांवर चर्चा झाली. त्यामध्ये कर्मचारी कल्याण निधीचा हिशेब कर्मचारी-शिक्षकांना दिलेला नाही, या मुद्यावर पदाधिकारी म्हणाले की, या निधीमध्ये जमा रकमेचे लेखा परीक्षण करण्यात आले की नाही. कोट्यवधी रुपयांचा निधी हा सध्या बेवारसपणे पडून आहे. त्याचा विनियोग करण्यासाठी कर्मचारी- शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात यावी. शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक (गणित, विज्ञान) यांची पदोन्नती करण्यात यावी. आंतरजिल्हा बदलीसाठी शिक्षकांना तात्काळ समुपदेशन पद्धतीने पदस्थापना देण्यात यावी. दैनंदिन ऑनलाईन कामे ही शिक्षकांवर न लादता ती स्वतंत्र यंत्रणेमार्फ त करण्यात यावीत, २०१० पर्यंत नियुक्त शिक्षकांना कायम करण्यात यावे. १२ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना चटोपाध्याय वेतनश्रेणी तात्काळ द्यावी. मूळ व दुय्यम सेवापुस्तिका अद्ययावत करण्यात याव्यात. कालबाह्य पुरवणी देयके तात्काळ निकाली काढावीत. यापुढे सर्व देयके ऑनलाईन निकाली काढण्यात यावीत, शिक्षकांच्या प्रश्नावर यानंतरही जर ठोस निर्णय झाला नाही, तर शिक्षक समिती येत्या १७ डिसेंबर रोजी जि. प. मुख्यालयासमोर तीव्र आंदोलन करील, असा इशारा समितीचे विजय साळकर, विष्णू भंडारे, नितीन नवले, जयाजी भोसले, शिवाजी एरंडे, रणजित राठोड आदींनी दिला.

---

**मराठवाडा : 'बामू', 'स्वारातीम' विद्यापीठांना फटका; संलग्नीकरणासाठी अर्ज करण्याची मुदत संपली**

# अभियांत्रिकी महाविद्यालये 'बाटू'शी होणार संलग्न

**औरंगाबाद :** मराठवाड्यातील बहुतांश अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व आर्किटेक्ट महाविद्यालयांनी रायगड जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी (बाटू) संलग्न होण्यास उत्सुकता दाखविली आहे. याचा फटका औरंगाबादेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व नांदेडमधील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांना बसणार आहे. 'बाटू'च्या संलग्नीकरणासाठी अर्ज करण्याची मुदत संपली असून, प्रस्तावांच्या छाननीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

राज्य सरकारने अभियांत्रिकी, औषधनिर्माण, आर्किटेक्ट महाविद्यालय एकाच छताखाली आणण्याच्या उद्देशाने लोणेरे येथील तंत्रशास्त्र विद्यापीठाला महाविद्यालयांचे संलग्नीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. संलग्नीकरणासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. यानुसार प्रस्ताव पाठविण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यातील ५९ महाविद्यालयांचे प्रस्ताव 'बाटू'कडे सादर झाल्याचे सूत्रांनी सांगितले. यात बहुतांश महाविद्यालये मराठवाड्यातील आहेत. मुंबई, पुण्याच्या महाविद्यालयांनी 'बाटू'कडे पाठ फिरवली. मात्र, मराठवाड्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांनी हात दिला आहे. याचा फटका मराठवाड्यातील दोन्ही विद्यापीठांना बसणार आहे. २०१७-१८ शैक्षणिक वर्षापासून ५९ महाविद्यालये 'बाटू' शी पूर्णपणे जोडले जाणार आहेत. २०१८-१९ शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व कॉलेजांना संलग्नीकरण बंधनकारक केले जाण्याची शक्यता आहे. राज्यात अभियांत्रिकी ३७५, आर्किटेक्ट ८३ तर फार्मसीचे १७० महाविद्यालये आहेत.

**पसंती 'बाटू'लाच**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या औरंगाबाद शहरातील बड्या अभियांत्रिकी महाविद्यालयांनी 'बाटू'ला पसंती दर्शविली आहे. सध्या संलग्नीकरणाचा निर्णय महाविद्यालय व्यवस्थापनावर अवलंबून आहे.

**डिसेंबरपर्यंत कार्यवाही पूर्ण**



- 'बाटू'कडे संलग्नीकरणासाठी दाखल झालेल्या प्रस्तावांच्या छाननीची प्रक्रिया ३ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संलग्नीकरणाच्या प्रक्रियेसाठी समित्या स्थापन करण्यात येतील.
- त्या समित्या संबंधित महाविद्यालयांना भेटी देऊन प्रस्तावातील बाबींची खातरजमा करणार आहेत. ही प्रक्रिया डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर नवीन शैक्षणिक वर्षात पूर्णपणे ही महाविद्यालये 'बाटू'ला जोडली जातील.